## प्रेसनोट
## पोलीस शिपाई भरती -२०१९.
---ooo---

**नाशिक परिक्षेत्रातील जळगाव जिल्हा पोलीस घटकात पोलीस शिपाई भरती-२०१९ प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्यानुसार जळगाव जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर एकूण १२८ पदांसाठी दिनांक ०९/१०/२०२१ रोजी जळगाव शहर व भुसावळ शहर येथील ६८ केंद्रांवर एकूण २१६९१ उमेदवारांची पोलीस शिपाई पदाकरीता १०० गुणांची बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे.** ज्या उमेदवारांनी जळगाव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९ करीता ऑनलाईन आवेदन अर्ज सादर केलेले आहेत, त्यांना ई-मेल द्वारे तसेच मोबाईल फोनवर संदेश पाठविण्यात आलेले असुन त्यांनी सदरहू संदेशामध्ये दिलेल्या लिंक वर क्लिक करुन आपले प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे किंवा **https://nashikpolicebharti.in/** या संकेतस्थळावरुन आपले प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे.

दि.०९/१०/२०२१ रोजी लेखी परीक्षा केंद्रावर परीक्षेच प्रवेशपत्र व वैध असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, मतदान कार्ड, शाळा महाविद्यायाचे ओळखपत्र इ. सोबत आणणे अनिवार्य असुन ज्या उमेदवारांकडे प्रवेशपत्र नसल्यास, त्यांना परीक्षा केंद्रात जाण्याची परवानगी देण्यात येणार नाही, याची सर्व संबंधीत उमेदवारांनी व्यक्तीश: नोंद घ्यावी. तसेच परीक्षा केंद्रावर परीक्षार्थी उमेदवारांनी पेन, पेन्सील, रबर, परीक्षेचे प्रवेशपत्र, व शासकीय कामकाजासाठी ग्राह्य असलेले कोणतेही फोटो असलेले मुळ ओळखपत्र याशिवाय इतर काहीही आक्षेपार्ह वस्तु, साधने आढळल्यास संबधित उमेदवारास पोलीस भरती प्रक्रियेतून अपात्र ठरविण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**उमेदवारांना लेखी परीक्षेच्या अनुषंगाने काही समस्या असतील तर त्या सोडवण्यासाठी पोलीस अधीक्षक, जळगांव कार्यालयात स्वतंत्र मदत कक्ष स्थापन करण्यात आलेला असुन उमेदवारांना सदरहू मदत कक्षाचा हेल्पलाईन नं.०२५७-२२३३५६९ देण्यात येत असुन परीक्षेविषयी काही समस्या असतील जसे की, प्रवेशपत्र डाऊनलोड न होणे, परीक्षा केंद्राचे ठिकाण इतर काही समस्या असलेल्या उमेदवारांनी तात्काळ पोलीस भरती मदत कक्षाशी संपर्क करुन त्या समस्याचे निरसरन करुन घ्यावे. सदरहू मदत कक्षात पो.नि. श्री मोरे यांची जबाबदार समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. व आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.**

**सदरहू लेखी परीक्षा संपल्यानंतर परीक्षेच्या दिवशी परीक्षेबाबत आदर्श उत्तर तालिका जळगांव जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच परीक्षेचा निकाल ४८ तासांच्या आत जळगांव जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.** परीक्षेविषयी उमेदवारांना काही हरकती आक्षेप असल्यास त्या हरकती व आक्षेप प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेतलेल्या संकेतस्थळावरील लिंकवर किंवा जळगांव जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या लिंकवर पाठवता येतील. उमेदवारांकडून आलेल्या हरकती व आक्षेप यावर योग्य तो निर्णय घेऊन पोलीस शिपाई भरती लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारावर शारीरीक चाचणी व कागदपत्र पडताळणी साठी गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर लेखी परीक्षा व शारीरीक चाचणी व कागदपत्र पडताळणी झाल्यानंतर निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

**पोलीस भरती प्रक्रिया अंत्यत पारदर्शी पणे राबविण्यात येत असुन त्यात कुणालाही हस्तक्षेप करता येणार नाही. पोलीस भरती प्रक्रियेसाठी एजंट /दलाल किंवा कोणत्याही व्यक्तीने उमेदवारांकडून पैशाची मागणी केल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. किंवा या कार्यालयास कळवावे.सदरहू बाबत खात्री करुन कठोर कारवाई करण्यात येईल. सदरचे प्रसिद्धीपत्रक जळगाव जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत संकेतस्थळ -www.jalgaonpolice.gov.in येथे देखील प्रसिध्द करण्यात आलेले आहे.**

ठिकाण:-जळगांव
दिनांक :-०७/१०/२०२१

पोलीस अधिक्षक कार्यालय जळगांव सत्यमेव जयते

( डॉ. प्रविण मुंढे )
पोलीस अधीक्षक जळगांव

**प्रति:-** संपादक- सर्व प्रसार माध्यमे (प्रिन्ट व इलेक्ट्रॉनिक मिडीया )
**प्रत:-** प्रभारी अधिकारी, स्थागुशा.

२/- सदरहू प्रेसनोट **दि.०८/१०/२०२१** रोजी स्थानिक वृत्तपत्रात विनामूल्य प्रसिद्ध करण्याची विनंती वर्तमानपत्राचे संपादक यांना न चूकता करण्यात यावी तसेच जळगांव जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.